महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४४ वे | दिनांक : ०४/०२/२०२६ | वार : बुधवार

# महापालिकांच्या महापौर-उपमहापौर निवडीचा धुरळा




**मुंबई** : राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांनंतर आता महापौर आणि उपमहापौर निवडीच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. अनेक शहरांना नवे कारभारी मिळाले आहेत. ठाणे, पुणे आणि कल्याण-डोंबिवलीत महायुतीचे वर्चस्व दिसून आले. या शहरांमध्ये भाजपने आपल्या मित्रपक्षांसोबत सत्ता स्थापन केली असून, अनेक ठिकाणी या निवडी बिनविरोध झाल्या आहेत. तर वसई-विरारमध्ये बहुजन विकास आघाडीने आपला गड राखला आहे. नाशिक आणि नागपुरात मात्र राजकीय चुरस कायम आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेत भाजपने येथे अमराठी कार्ड खेळत डिंपल मेहता यांना महापौरपदी बसवले आहे. त्यांनी काँग्रेसच्या रुबीना शेख यांचा ७९ विरुद्ध १६ अशा मोठ्या फरकाने पराभव केला. उपमहापौरपदी भाजपचे ध्रुवकिशोर पाटील निवडून आले.

**पुणे महानगरपालिका**

पुणे महापालिकेच्या महापौरपदासाठी भाजपच्या नगरसेविका मंजूषा नागपुरे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महापौर पदाची निवडणूक बिनविरोध होणार असल्याने निवडणूक औपचारिकता राहिली होती. प्रभाग क्रमांक 35 सनसिटी माणिक बाग येथून भाजपच्या उमेदवार मंजुषा नागपुरे या बिनविरोध निवडून आल्या आहेत. तर उपमहापौर पदासाठी आरपीआयचे परशुराम वाडेकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

**ठाणे महानगरपालिका**

३ वर्षे १० महिन्यांच्या प्रशासकीय राजवटीनंतर ठाणे पालिकेला महापौर मिळाले आहेत. ठाणे महापालिकेच्या मंगळवारी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या शर्मिला पिंपळोलकर यांची महापौर पदी तर, भाजपचे कृष्णा पाटील यांची उपमहापौर पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

**वसई-विरार महानगरपालिका**

वसई-विरारमध्ये बहुजन विकास आघाडीने (बविआ) पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. भाजपच्या ॲड. दर्शना त्रिपाठी-कोटक यांचा पराभव करत बविआचे अजीव यशवंत पाटील महापौर बनले. महापौर पदासाठी रिंगणात अनेक उमेदवार होते, मात्र मुख्य लढत बविआ आणि भाजपमध्ये झाली.

बविआकडून अजीव यशवंत पाटील, प्रफुल्ल साने आणि निशाद चोरघे यांनी अर्ज भरले होते. त्यांच्या विरोधात भाजपच्या ॲड. दर्शना त्रिपाठी-कोटक रिंगणात होत्या. बविआकडून मार्शल डॉमनिक लोपीस आणि कन्हैया भोईर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. भाजपच्या वतीने नारायण मांजरेकर नशीब आजमावत होते.

**नागपूर महानगरपालिका**

नागपूर येथील महानगरपालिकेत भाजपानं महापौर पदासाठी प्रभाग क्रमांक 28 मधील नगरसेविका नीता ठाकरे, तर उपमहापौर पदासाठी तर प्रभाग क्रमांक 29 मधील नगरसेविका लीना हाथीबेड यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली आहे. सोमवारी (2 फेब्रुवारी) दोन्ही महिला उमेदवारांनी नागपूर महानगरपालिकेच्या कार्यालयात आपले नामांकन अर्ज दाखल केले.

नागपूर महानगरपालिकेच्या एकूण 151 जागांपैकी काँग्रेसने 34 जागांवर यश मिळवले आहे. त्यामुळे महापौर आणि उपमहापौर निवडणुकीसाठी भाजपविरोधात काँग्रेसनेही आपले उमेदवार मैदानात उतरवले आहेत. काँग्रेसने महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे, तर उपमहापौर पदासाठी विवेक निकोसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, संख्याबळ पाहता भाजपचे पारडे जड असून, महापौर आणि उपमहापौर भाजपचाच होईल, हे निश्चित मानले जात आहे.

**नाशिक महानगरपालिका**

नाशिक महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपने हिमगौरी आडके यांना उमेदवारी जाहीर केली, तर उपमहापौरपदासाठी मच्छिंद्र सानप यांचा अर्ज दाखल करण्यात आला. या निवडणुकीत भाजपची मजबूत स्थिती असल्याने त्यांचे उमेदवार विजयी होण्याची शक्यता प्रबळ आहे, परंतु विरोधी पक्षांकडूनही जोरदार आव्हान उभे राहिले आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांनीही या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून (शिवसेना उबाठा) महापौरपदासाठी प्रभाग क्रमांक १५ मधून निवडून आलेल्या सीमा पवार यांनी उमेदवारी अर्ज सादर केला आहे. या अर्जामुळे निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून (शिंदे शिवसेना) उपमहापौरपदासाठी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यात महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, राहुल दिवे आणि विलास शिंदे यांचा समावेश आहे. शिंदे सेनेची ही आक्रमक भूमिका लक्षवेधी आहे. भाजप स्वबळावर सत्तेत असतानाही शिंदे सेनेने महापौर आणि उपमहापौर पदांसाठी उमेदवारी जाहीर केल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

**कल्याण - डोंबिवली महानगरपालिका**

कल्याण डोंबिवलीला तब्बल 6 वर्षांनंतर महापौर आणि उपमहापौर मिळाले असून आज झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये या पदांसाठी निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली. महापौर पदी शिवसेनेच्या ॲड. हर्षाली थविल चौधरी यांची तर उपमहापौर पदी राहुल दामले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कल्याण डोंबिवलीच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी एकच अर्ज आल्याने ही निवड केवळ औपचारिकता ठरली.

**अहिल्यानगर महानगरपालिका**

अहमदनगरचे नाव 'अहिल्यानगर' झाल्यानंतर ज्योती गाडे या पहिल्या महापौर ठरल्या आहेत. त्या भाजपचे दिवंगत नेते शिवाजी कर्डिले यांच्या कन्या आहेत. उपमहापौरपदी विखे-पाटील यांचे निष्ठावंत ॲड. धनंजय जाधव यांची निवड झाली आहे. येथे भाजप-राष्ट्रवादी युतीने शिवसेनेला सत्तेपासून लांब ठेवले आहे.

**अमरावतीत 'सव्वा-सव्वा' वर्षांचा फॉर्म्युला**

अमरावती महापालिकेत भाजपा, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना अशी महायुतीची सत्ता बसण्याचा मार्ग सोमवारी मोकळा झाला. भाजपाकडून श्रीचंद तेजवानी यांनी महापौर पदाचा तर युवा स्वाभिमानकडून सचिन भेंडे यांनी उपमहापौर पदाचा अर्ज दाखल केला.

श्रीचंद तेजवानी पहिले सव्वा वर्ष महापौर राहतील. त्या पुढच्या सव्वा वर्षात आशिष अतकरे महापौर होतील. याच पद्धतीने युवा स्वाभिमान पक्षाचे पाहिले सव्वा वर्ष सचिन भेंडे उपमहापौर असतील. त्या पुढचे सव्वा वर्ष अजय जयस्वाल हे पदभार सांभाळतील.

महापौर व उपमहापौर पदाच्या ६ फेब्रुवारीला होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्येकी तीन अर्ज नगरविकास सचिवांकडे आज प्राप्त झाले. त्यात महापौरपदासाठी भाजपाचे श्रीचंद तेजवानी, काँग्रेसचे डॉ. संजय शिरभाते, बसपाचे ईस्माईल लालुवाले यांनी अर्ज दाखल केले आहे. उपमहापौर पदासाठी युवा स्वाभिमानचे सचिन भेंडे, काँग्रेसच्या लुबना तनवीर, बसपाचे सचिन वैद्य यांनी अर्ज दाखल केले आहे. ६ फेब्रुवारीला होणाऱ्या निवडणुकीत मतदान होते की निवड बिनविरोध होते, याकडे लक्ष लागले आहे.

# एवढा नीचपणा राजकारणात बरोबर नाही नितेश राणेंचे संजय राऊतांवर टीकास्त्र



**बारामती** : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांचा विमान अपघात, घातपात असल्याचा संशय शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी संसदेत बोलताना व्यक्त केला होता. त्यांनी केलेल्या या विधानावर भाजप नेते व मंत्री नितेश राणे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अजित पवार यांना जाऊन फक्त चार-पाच दिवस झालेत. त्यावर तरी राजकारण करू नका, एवढा नीचपणा राजकारणात बरोबर नाही, असे राणे यांनी म्हटले आहे.

मंत्री नितेश राणे यांनी बारामती येथे जाऊन पवार कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, अजितदादांना जाऊन आता जेमतेम 3-4 दिवस झाले. त्यावर तरी राजकारण करू नका. त्यांच्या आत्म्याला जरा शांती मिळू द्या. हे सगळे विषय नंतर बोलत येत नाहीत का? काय घाई लागली आहे तुम्हाला? कुठले तर्क लावताय तुम्ही? काय संबंध आहे अमित शहांचा आणि पवार साहेबांच्या पक्षाचा? पवार कुटुंबाची अवस्था बघा, असे राणे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना नितेश राणे म्हणाले, मी त्यांच्या घरात जाऊन आलो. तेवढीही माणुसकी संजय राऊतांनी दाखवली नाही. मी घरात जाऊन आलोय. काय अवस्था आहे त्या घराची हे त्यांनी जाऊन बघावे आणि मग टीका करावी. सगळीकडे राजकारण? काहीतरी भान ठेवा. अगोदर आपण माणूस आहोत, मग कोण राजकारणी, कोण खेळाडू आहे. सगळीकडे राजकारण बरोबर नाही. एवढा नीचपणा राजकारणात पण बरोबर नाही. कुठेतरी मर्यादा असल्या पाहिजे. महाराष्ट्राच्या कल्चरसाठी पण हे बरोबर नाही. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, अशी टीका राणेंनी केली आहे.

संजय राऊत यांना फिलिंग्स आहेत का कोणाच्या कुटुंबाबद्दल? मी त्या माणसाच्या प्रश्नांना उत्तर का देऊ? आणि कुठली फाईल, कुठे आहे? हे संजय राऊतांना कोण सांगून करतंय का? अशाने संजय राऊत यांना कोण विचारणार नाही, असेही नितेश राणे यांनी म्हटले.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ फेब्रुवारी २०२६

## मराठी भाषेतील बोली समृद्ध झाली पाहिजे - कवी डॉ. प्रभाकर शेळके




**देऊळगाव राजा** : व्यंकटेश कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देवळगाव राजा जि बुलढाणा येथील महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला पण मराठी बोलीभाषेचे जतन झाले पाहिजे. अजूनही मॅकोलेची शिक्षण पध्दती, हार्बटची पंचपदी त्यानुरूप अध्यापन पद्धती आहेत.असो,इंग्रजी भाषा सक्तीची, पण मायबोली नुक्तीची... फुटू द्या इंग्रजी शाळेचे पेवं.पण मातृभूषेला नाही कुणाचे भेव..पण मराठी भाषा ही अभिव्यक्तीची भाषा आहे.जो बोली तून बोलतो तो मनातून व्यक्त होतो.बोली भाषेचे कुळ आणि मुळ शोधले तर ते मराठी भाषाचं समृद्ध आहे .ती 'अ' आईच्या स्वराची आहे.. भाषा अंनत युगाची, भाषा माझी अभिजात.बोली शैलीने जागली,माय मराठीची ज्योत. माय मराठी मराठी, आहे अमृताची खणी 'अ'आईच्या स्वरांनी,माझी ओथंबली वाणी... त्यांच्या काव्यमय भाषेतून मराठी भाषेचे गौरव गीत सादर केले.या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक प्र प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर गोरे,मराठी विभाग प्रमुख डॉ मधुकर जाधव उद्घाटक साहित्यिक डॉ भगवान खरात यांच्या शुभहस्ते झाले. प्रास्ताविक कवीवर्य डॉ मधुकर जाधव यांनी केले. कवीसंमेलानात कवयत्री अश्विनी जाधव, विजय दळवी, जयदीप विघ्ने ,प्रशांत डोंगरदिवे यांनी अतिशय सार्थकतेने सुत्रसंचलन कवी संमेलनाचे सुत्रसंचलन केले मुख्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ ज्योती देशमुख यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा सीमा धुळे यांनी केले.

## डॉ. शीला स्वामी यांची सोलापूर विद्यापीठाच्या एनएसएस अभ्यास मंडळावर निवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील श्री. माधवराव पाटील महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. शीला स्वामी यांची नुकतीच सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड झाल्याचे पत्र विद्यापीठाकडून कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू लक्ष्मीकांत दामा यांच्याकडून प्राप्त झाले आहे. स्वामी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात स्तरावर विविध प्रकारच्या समित्या व उपक्रमांमध्ये उत्कृष्ट सहभाग नोंदवला आहे. त्यांनी जिल्हा समन्वयक, सल्लागार व एनएसएस कार्यक्रमाधिकारी म्हणून सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, संचालक डॉ. सतीश शेळके, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. सुभाष हुलपल्ले आदींनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

## पिंपरी चिंचवडच्या स्पा सेंटर्समधील देहविक्रीचा पर्दाफाश



**पुणे** : पिंपरी-चिंचवड शहरातील स्पा सेंटर्स आणि लॉजच्या नावाखाली चालणाऱ्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश करत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली असून एकूण आठ महिलांची सुटका केली आहे. या धडक मोहिमेत विशालनगर येथील इंटरनल फॅमिली स्पामधून चार, निगडी येथील ईगल स्पामधून दोन, तसेच कृष्णा लॉज आणि आळंदी येथील योगीराज लॉजवर छापे टाकून प्रत्येकी एका महिलेची सुटका करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनायक कुमार चौबे यांच्या आदेशानुसार, स्पा सेंटर्समधील बेकायदेशीर वेश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने ही मोठी कारवाई केली आहे. ही धडक मोहीम पोलिस उपायुक्त शिवाजी पवार आणि सहाय्यक पोलिस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, पोलिस निरीक्षक नितीन गीते यांनी या पथकाचे यशस्वी नेतृत्व केले.

वाकड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 'इंटरनल फॅमिली स्पा'वर रात्री 10 च्या सुमारास धाड टाकत पोलिसांनी चार पीडित महिलांची सुटका केली असून याप्रकरणी स्पा व्यवस्थापक अब्दुल मोहम्मद हुसेन कलाम याला अटक करण्यात आली आहे. या अवैध व्यवसायाचे संचलन करणाऱ्या संबंधित महिलेसह मॅनेजरवर 'पीटा' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

निगडी येथील ईगल स्पा, कृष्णा लॉज आणि आळंदीतील योगीराज लॉजवर पोलिसांनी धडक कारवाई करत पीडित महिलांची सुटका केली आहे. अधिक पैशांचे आमिष दाखवून आणि जबरदस्ती करून महिलांना या बेकायदेशीर वेश्यव्यवसायाच्या दलदलीत ओढले जात असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

शहरातील अशा अनैतिक प्रकारांना आळा घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तांनी कठोर पावले उचलली असून, गेल्या एका महिन्यात तीन मोठ्या आस्थापनांवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. यामध्ये चिंचवडमधील निक्की लॉज, काळेवाडीतील लेमन ग्रास थाई स्पा आणि सांगवी येथील औरा थाई स्पा यांचा समावेश आहे.

पोलिस निरीक्षक नितीन गीते यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, 2025 सालात आतापर्यंत पोलिसांनी एकूण 25 स्पा सेंटर्सवर छापे टाकून 'पीटा' कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. या सातत्यपूर्ण मोहिमेत आतापर्यंत 45 आरोपींना अटक करण्यात आली असून, तब्बल 63 पीडित महिलांची सुरक्षितरीत्या सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ फेब्रुवारी २०२६

## जागतिकीकरणानंतर

गावातील माणसांमध्ये,
नात्यागोत्यात होता मेळ.
आपुलकीने भेटण्यासाठी,
संध्याकाळची होती वेळ.

जागतिकीकरणानंतर,
गावात बदल झाला राव.
आधुनिकतेच्या नावाखाली,
बदलला आहे सारा गाव.

सोयी सुविधा कमीच होत्या,
माणसा माणसात होता लळा.
सोयी सुविधा हाती लागताच,
ओस पडला माणुसकीचा मळा.

गल्लोगल्ली पोरांचा घोळका,
खेळताना दिसत होता राव.
मित्र मित्रांच्या अडचणीत,
न सांगताच घेत होता धाव.

सोयी सुविधा आल्यापासून,
जगण्यात बदल झाला खूप.
बर्गर पिझ्झाच्या नादी लागून,
मुलांनी विसरले दही दूध तूप.

करलो दुनिया मुठ्ठी मे म्हणत,
विश्वात गुंतून राहिला गाव.
मोबाईल हाती आल्यापासून,
शेजाऱ्याचे विसरला नाव.

बदललेलं चित्र पाहून वाटते,
आज खरंच बदलले आहे गाव.
सोयी सुविधा संपत्ती असून सुद्धा,
माणुसकीला मिळत नाही भाव.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात आरोग्य समुपदेशन कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात आरोग्यवर्धिनी समितीअंतर्गत आरोग्य समुपदेशन कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ व्हावे या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या "दशसूत्री" कार्यक्रमाचा एक भाग म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. सुनंदा चक्रनारायण होत्या. प्रमुख मार्गदर्शिका म्हणून डॉ. वैष्णवी गडाम उपस्थित होत्या. तसेच डॉ. मीनाक्षी देव, पर्यवेक्षिका माधुरी भावसार आणि डॉ. चिन्मय कंकाळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.मार्गदर्शन करताना डॉ. वैष्णवी गडाम यांनी पी.पी.टी.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आरोग्य व आहारविषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली. जंक फूड, फास्ट फूड आणि कोल्ड्रिंक यांचे अति सेवन शरीरासाठी किती घातक आहे, यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. तसेच कोणतेही पॅक्ड फूड सेवन करण्यापूर्वी त्यातील घटक (Ingredients/ Contents) काळजीपूर्वक तपासावेत, असा महत्त्वाचा सल्लाही त्यांनी दिला. जंक फूडच्या अतिसेवनामुळे कोणते आजार उद्भवू शकतात, हे स्पष्ट करत त्यांनी त्यावर प्रतिबंधात्मक उपायही सांगितले. यावेळी त्यांनी जंक फूड व फास्ट फूडला घरगुती पर्याय कोणते असू शकतात, याची माहिती देत विद्यार्थ्यांना फळे, ताजे व पौष्टिक घरगुती अन्न सेवन करण्याचे आवाहन केले. घरचा संतुलित आहार व नियमित सवयी अंगीकारल्यास आरोग्य उत्तम राहू शकते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी, "घरचा आहार खा आणि तंदुरुस्त रहा!" असा संदेश दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधुरी भावसार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. रविंद्र परभाणे यांनी केले. शेवटी आरोग्यविषयक प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान




**मुरूम (प्रतिनिधी) :** राज्यांतील गुणी, कर्तव्यनिष्ठ व समाजाभिमुख शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल सन्मान शिर्डी येथे रविवार (ता. १) रोजी साई पालखी निवारा येथे बी दि चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शिक्षक हे समाजाची भावी पिढी घडविणारे खरे शिल्पकार असून, त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचा गौरव व्हावा, या उद्देशाने बी दि चेंज फाउंडेशनतर्फे दरवर्षी या राज्य स्तरावरील पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. या वेळी कर्नल सुनील राजदेव, माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे, अभिनेत्री सौ. निवेदिता पगार, क्विरिप्लायचे सीईओ ऋषिकेश खैरनार, एम्स अकॅडमीचे संचालक सुधाकर शृंगारे, अमृत रोहोम, संस्थेचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे, विश्वस्त अभिषेक तुपे आदींच्या हस्ते डॉ. सुधीर पंचगल्ले यांना मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, फेटा बांधून यथोचित सत्कार करण्यात आला. मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील योगदानातून आदर्श विद्यार्थी घडविल्याबद्दल राज्य आदर्श शिक्षक २०२६ या पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील, नगर शिक्षण विकास मंडळ संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, संचालक डॉ. सतीश शेळके, माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. महेश मोटे, डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. शिवपुत्र कनाडे आदींनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ फेब्रुवारी २०२६


## सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज - प्रगतिशील शेतकरी श्री किसनराव सोलाट




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असून यामुळे मानवी जीवन रोगराईमुक्त होईल असे प्रतिपादन मांडवा येथे जेइएस महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रगतिशील शेतकरी श्री किसनराव सोलाट यांनी केले. जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. २९जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान करण्यात आले आहे. पाचव्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात आधुनिक शेती व तंत्रज्ञान या विषयावर मांडवा येथील प्रगतिशील शेतकरी श्री किशनराव सोलट यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा. डॉ. अमोल खांडेभराड होते. व्यासपीठावर प्रा मनीषा सुतार, प्रा डॉ मिताली बगडिया, डॉ अरुणा मारोडकर, प्रा. मनोज महेर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना श्री किसनराव सोलाट मनारे की शेतकऱ्यांनी शेतीमध्ये पाणी आडून, पाणी जिरवले पाहिजे .जलसंवर्धन ही काळाची गरज आहे शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती केली, तर समाज रोगराईमुक्त होईल सेंद्रिय शेती करणे सुद्धा ही काळाची गरज आहे आज पिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर कीटकनाशके फवारले जातात, उत्पादन वाढीसाठी रासायनिक खताचा वापर केला जातो ,ही गोष्ट चुकीची आहे. शेतकरी अन्नदाता असून तो जगाचा पोशिंदा आहे त्याने सेंद्रिय शेती करून उत्पादन घेतले पाहिजे असे प्रतिपादन श्री सोलाट यांनी केले.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ.अमोल खांडेभराड म्हणाले की शेतकऱ्यांनी कीटकनाशके व रासायनिक खतांचा वापर टाळला पाहिजे यामुळे जमिनीचा कस कमी होत असून ती नापीक बनत आहे. असेही प्रा .खांडेभराड यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा.योगेश लहामाटे प्रा किशोर तापडिया आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैशाली दोडके, पाहुण्यांचे स्वागत ऋतूजा बनसोडे , तर उपस्थितांचे आभार लहू किंगरे यांनी मानलेत.

## बीएसएफ मध्ये दिनेश महादेव माने यांची निवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील नेहरूनगर भागातील दिनेश महादेव माने यांची स्टाफ सिलेक्शन कमिशन मार्फत पॅरामिलिट्री फोर्समधून बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये निवड झाली. दिनेश माने यांचे वडील महादेव माने व आई अनिता माने यांची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असताना कुटुंबाचा गाडा चालविण्यासाठी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत व कसेबसे कुटुंबाचा खर्च, चार अपत्यांचा शिक्षणाचा खर्च याचा मेळ घालत ते दररोज पहाटे चार पासूनच व्यवसायासाठी धडपडतात. दिनेश यांनी आई-वडिलांना भाजीपाला व्यवसायात मदत करून मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात मार्च-एप्रिल २०२४ मध्ये बी.एस्सी. पदवी सर्वोत्कृष्ट मार्कांनी प्राप्त केली. सातत्यपूर्ण अभ्यास, शारीरिक कष्ट, नियमित व्यायाम, मैदानी सराव करत खुल्या प्रवर्गातून जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत यश संपादन केले. त्यात ९५ बटालियन बीएसएफ हरियाणा येथे लवकरच प्रशिक्षणाकरिता जाणार आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, माधवराव पाटील महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह शहरवासीयांकडून त्यांचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# महापौर पदाच्या निवडणुकीत पत्ते उघडू, इम्तियाज जलील यांचे सूचक विधान



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका निवडणुकीत ५७ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी अवघ्या एका जागेची कमतरता भासत असल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे ३३ जागा जिंकून एमआयएमने दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी इतर सर्व पक्ष एकत्र येणार का आणि एमआयएम नेमकी काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, १० तारखेला होणाऱ्या महापौर निवडणुकीबाबत राजकारणात काहीही होऊ शकते, असे सूचक विधान करत इम्तियाज जलील यांनी सस्पेन्स अधिकच वाढवला आहे. तसेच १० तारखेला पत्ते उघडू, असेही त्यांनी म्हटले आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीसाठी एमआयएमने आपला उमेदवार रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय चुरस वाढली असून, भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी एमआयएम चक्क शिवसेनेसोबतही जाण्याचा विचार करत असल्याचे संकेत इम्तियाज जलील यांनी दिले आहेत. १० तारखेला होणाऱ्या मतदानावेळी काहीतरी धक्कादायक घडण्याची शक्यता वर्तवत, जलील यांनी सध्या विविध पक्षांशी वाटाघाटी सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भाजपला शह देण्यासाठी दोन्ही शिवसेना एमआयएमला पाठिंबा देऊन नवीन राजकीय समीकरण उभे करणार का, याबाबतचा सस्पेन्स आता अधिकच गडद झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ११५ जागांपैकी बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ५८ च्या आकड्यापासून भाजप (५७ जागा) अवघ्या एका पाऊल अंतरावर असून, त्यांना सत्तेपासून रोखण्यासाठी एमआयएम (३३), शिंदे यांची शिवसेना (१३), ठाकरे यांची शिवसेना (६), वंचित (४), काँग्रेस (१) आणि राष्ट्रवादी शरद पवार गट (१) या सर्व विजातीय पक्षांना एकत्र येऊन ५८ ही 'मॅजिक फिगर' गाठावी लागेल.

तांत्रिकदृष्ट्या हे समीकरण शक्य असले तरी सध्याच्या राज्यातील महायुतीच्या राजकीय वास्तवामुळे भाजप आणि शिंदे यांची शिवसेना एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याची शक्यता अधिक प्रबळ आहे. मात्र राजकारणातील अनिश्चितता पाहता, भाजपला शह देण्यासाठी सर्व विरोधकांची ही अशक्यप्राय वाटणारी युती प्रत्यक्षात येणार का, याबाबतचे औत्सुक्य शिगेला पोहोचले आहे.